

# वचनपूर्तीच्या दिशेनं...



भारतीय जनता पार्टी
वचनबद्ध नेतृत्व

*I have a vision of a Modern India. I have embarked on a huge mission to convert that vision into reality. My mantra is Development!*

सबका साथ; सबका विकास!



योग्य दिशा, स्पष्ट नीती...



# न म स्का र,

विकास आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासन या दोन प्रमुख मुद्द्यांवर भारतीय जनता पार्टीने २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत कौल मागितला. जनतेने या मुद्द्यांना अभूतपूर्व प्रतिसाद देत एकहाती सत्ता दिली.
नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली २६ मे २०१४ रोजी सत्तेची सूत्रे हाती घेतल्यापासून प्रचंड निर्धाराने देशाचे दीर्घकालीन हित डोळ्यांसमोर ठेवून वाटचाल सुरू आहे. केंद्रातील सत्तेला महाराष्ट्रानेही साथ द्यावी, या भावनेतून राज्यातील जनतेनेही विश्वासाने भारतीय जनता पार्टीच्या हाती सत्तेची धुरा सोपविली.
पुण्यातील जनतेने मला आणि आठही विधानसभा मतदारसंघांतून भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांना विजयश्री मिळवून दिली. भ्रष्टाचारातून सोडवा आणि विकासाचा रथ दौडवा, या भावनेतून हा कौल लाभला.

गेले २४ महिने भ्रष्टाचाराचा एकही डाग नसलेले शासन देश अनुभवतो आहे. विकासासाठी फक्त लोकानुनयी निर्णय न घेता, भावी पिढ्यांचा विचार करून दीर्घकालीन हिताचे निर्णय घेतले जात आहेत. माझ्या खासदारकीची आणि केंद्र सरकारच्या कारकिर्दीची दोन वर्षे पूर्ण होत असताना तुमच्याशी

संवाद साधणे मला खूप आवश्यक आणि महत्त्वाचे वाटते. केंद्रातील काही निर्णयांची उजळणी करावी, राज्य सरकारच्या काही महत्त्वाच्या निर्णयांकडे लक्ष वेधावे आणि माझ्या कामगिरीचा आढावा मांडावा, या हेतूने हा अहवाल आपल्यासमोर ठेवतो आहे.

खासदार हा देशातील कायदेमंडळाचा सदस्य असतो. सरकारने आखलेल्या धोरणांना कायद्याच्या चौकटीत तावूनसुलाखून घेणे, ही प्रमुख जबाबदारी संसद पार पाडते. अशा संसदेच्या सभागृहात माझी भूमिका अत्यंत प्रामाणिकपणाने मी पार पाडतो आहे. याचबरोबर या शहराचा एक जागरूक आणि संवेदनशील लोकप्रतिनिधी म्हणूनही मी भूमिका निभावतो आहे. 'पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण' (पीएमआरडीए) ही संस्था पुण्याच्या विकासासाठी आवश्यक असल्याचे गेली पंचवीस वर्षे बोलले गेले. युतीचे सरकार असताना त्या संदर्भातील अधिसूचना निघाली आणि आज भारतीय जनता पार्टीचे सरकार आल्यावर 'पीएमआरडीए' प्रत्यक्ष अस्तित्वात आली. शहराभोवतीचा रिंगरोड आणि भविष्यातील वाढत्या शहराची नियोजनबद्ध वाढ यासाठीचा मार्ग खुला झाला आहे. पुण्यातून वाहणारी मुठा नदी स्वच्छ करण्यासाठी 'जायका प्रकल्प' प्रत्यक्षात आला. पुणे हे देशातील सर्वोत्तम शहर होण्यासाठी त्याची 'स्मार्ट सिटी'त निवड होणे, माजी सैनिकांना 'वन रँक वन पेन्शन' ही माझी आश्वासने प्रत्यक्षात उतरली आहेत. सामान्यातील सामान्य माणसाला आर्थिक आणि आरोग्यसुरक्षा उपलब्ध होण्यासाठी केंद्र सरकारने 'प्रधानमंत्री जन-धन योजना', 'अटल पेन्शन' योजना आणल्या. पुण्यातून या योजनांचा लाभार्थी मोठ्या संख्येने राहावा, हा प्रयत्न केला. त्याला उदंड प्रतिसाद मिळाला.

'समस्यामुक्त पुणे' हा माझा निर्धार असून, माझ्या कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला त्याच्या समस्येची तड लागू शकते, हा विश्वास देण्यात मी यशस्वी झालो आहे. गेल्या दोन वर्षांतील माझ्या कामाचा हा लेखाजोखा आहे. ही जबाबदारी अधिकाधिक सक्षमपणाने पार पाडण्यासाठी तुमच्या सूचनांचे कायमच स्वागत आहे.

लोकप्रतिनिधिपदाची जबाबदारी पार पाडत असताना मला मनापासून साथ देणारे सर्व पुणेकर नागरिक, केंद्र व राज्य सरकारचे मंत्री, आमदार, पक्षसंघटनेतील सर्व पदाधिकारी, नगरसेवक, सहकारी कार्यकर्ते यांच्याप्रति मी कृतज्ञ आहे.

धन्यवाद!

- **अनिल शिरोळे**

# वचनबद्ध नेतृत्वाची दोन वर्षे

**खासदार अनिल शिरोळे** यांच्या पहिल्या दोन वर्षांतील कामगिरीचा ठळक आढावा

- गेल्या दोन वर्षांतील संसदेतील उपस्थिती (सरासरी ९५.२८ टक्के) ही राष्ट्रीय (८३ टक्के) आणि राज्यस्तरीय सरासरीपेक्षा (८१ टक्के) सरस

---

- केंद्रातील वित्त, संरक्षण आणि प्राकलन अशा महत्त्वाच्या समित्यांमध्ये समावेश

---

- शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने 'स्मार्ट सिटीज् मिशन'मध्ये पुण्याचा समावेश करण्याच्या उद्देशाने केंद्र, राज्य आणि महानगरपालिका या तिन्ही पातळ्यांवर यशस्वी पाठपुरावा

---

- पुण्यातील प्रस्तावित मेट्रो ही निर्दोष व किफायतशीर असावी यासाठी सतत प्रयत्नशील

---

- सर्व प्रमुख रस्त्यांवर दर पाच मिनिटांनी नागरिकांना बस मिळावी या दृष्टीने शहरासाठी आवश्यक पुरेशा तीन हजार बसेस आणि त्यांच्या डेपोच्या जागेसाठी सातत्याने पाठपुरावा. टीपी स्कीम लागू केल्यास या जागा त्वरित मिळतील म्हणून आग्रही. तसेच कोथरूड डेपो - लोहगाव - वडगाव शिंदे - वाघोली या मार्गावर बॅटरीवर चालणारी बस 'पीएमपीएमएल'तर्फे सुरू करण्यासाठी प्रयत्नशील

---

- पुणे शहर आणि परिसराचा एकात्मिक व नियोजनबद्ध विकास करण्याच्या दृष्टीने बहुप्रतीक्षित 'पीएमआरडीए' स्थापन करण्यासंदर्भात पुढाकार

---

- पुणे शहरात 'सन २०२२ पर्यंत सर्वांना घर' ही योजना राबविण्यासाठी प्रयत्नशील

- केंद्राच्या ‘सोलर सिटी योजने’त पुण्याचा समावेश होण्यासाठी यशस्वी पाठपुरावा

- ‘राष्ट्रीय नदी संवर्धन योजने’अंतर्गत (एनआरसीपी) मुळा-मुठेतील मैलापाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी ११ सांडपाणी प्रक्रिया केंद्रे उभारण्याच्या ९९० कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी ‘जायका प्रकल्पा’ला केंद्राची मान्यता मिळवून देण्यात यश. गुजरातमधील साबरमती नदीच्या धर्तीवर मुळा-मुठा नदीकाठ सुशोभीकरण प्रकल्पासाठी पुढाकार

- लोहगाव विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी हवाई दलाची १५.८४ एकर जागा मंजूर करून घेण्यासंदर्भात यशस्वी पाठपुरावा. अतिरिक्त ३२ एकर जमिनीची संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर यांच्याकडे मागणी

- पुण्यासाठी स्वतंत्र विमानतळ उभारण्याच्या प्रस्तावाचा पाठपुरावा सुरू असून, लवकरच या प्रस्तावित विमानतळाची जागा निश्चित होण्याची शक्यता

- घोरपडी-लुल्लानगर परिसरातील वाहतूकप्रश्नात जातीने लक्ष. संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर यांची बैठक आयोजित करून दोन उड्डाणपुलांना मंजुरी. लुल्लानगर उड्डाणपुलाचे भूमीपूजन संपन्न

- रहदारीच्या चांदणी चौकात नवीन उड्डाणपुलासाठी ‘एनएचएआय’ आणि केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक व जहाजमंत्री नितीन गडकरी यांच्याशी पत्रव्यवहार करून प्रकल्प मार्गी लावण्यात यश

- बालेवाडी-म्हाळुंगे-हिंजवडी-माण मार्गासाठी सातत्याने पाठपुरावा. या मार्गाचे काम अंतिम टप्प्यात

- लोणावळा-दौंड मार्गावर रेल्वेची अतिरिक्त लाइन टाकून लोकल सेवा सुरू करण्यासाठी यशस्वी प्रयत्न. प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात

- शहरातील वाहतुकीवरील ताण कमी करण्याच्या उद्देशाने प्रस्तावित १७० किमीच्या वर्तुळाकार रिंग रोडसाठी प्रयत्न

- खासदार निधीतून गेल्या दोन वर्षांत एकूण ३ कोटी ९१ लाख २६ हजार रुपयांच्या ४५ विकास कामांना मंजुरी

- 'सांसद आदर्श ग्राम योजने'अंतर्गत वडगाव शिंदे या गावातील विकासकामे प्रगतिपथावर. याव्यतिरिक्त मुळशी व शिरूर तालुक्यातील कोळावडे व कासारी या गावांच्या विकास कार्यक्रमाची आखणी सुरू

- जेनेरिक औषधांचा प्रभावी वापर, तसेच स्टेंटचा खर्च कमी करून औषधोपचारांच्या एकूण खर्चात कपात व्हावी, यासाठी ससून रुग्णालयातर्फे प्रयत्न. 'ससून'मध्ये स्वच्छतेचा कार्यक्रम राबविण्यामध्ये सहभाग

- 'पंतप्रधान राष्ट्रीय साहाय्यता निधी'अंतर्गत पुण्यातील गरजूंना ५७ लाख ४३ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी मोलाची मदत

- 'हिंदुस्तान अँटिबायोटिक्स'मधील कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न

- तांत्रिक बिघाडांमुळे पोस्टातील ऑनलाईन गुंतवणुकीचा पर्याय ठप्प झाल्यावर गुंतवणूकदारांचे हित लक्षात घेऊन नागरिकांना ऑफलाईन गुंतवणुकीचा पर्याय खुला करून देण्यात यश

- 'लायगो इंडिया प्रकल्पां'तर्गत महत्त्वाची अत्याधुनिक प्रयोगशाळा स्थापण्यासाठी हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ येथील जागेची शिफारस करून त्याला अंतिमतः मान्यता मिळवून देण्यास मदत

- सेवानिवृत्त सक्षम जवानांना आर्थिक स्वावलंबनासाठी पोलिस म्हणून नेमण्यासाठी प्रयत्नशील

- गुंतवणूकदारांचे हित लक्षात घेऊन रुपी बँकेचे लायसन्स रद्द होऊ नये यासाठी यशस्वी प्रयत्न



ऑक्टोबर २०१४ मध्ये राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्यासमवेत भूतान दौऱ्यात सहभाग. द्विराष्ट्रीय संबंध वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या या दौऱ्यात दोन्ही देशांमध्ये शिक्षण, ऊर्जाविषयक करार झाले

---

'एमएनजीएल'तर्फे पुणेकरांना पाईपद्वारे स्वयंपाकाचा गॅस उपलब्ध करून देण्यासाठी यशस्वी प्रयत्न

---

'गंगा पुनरुज्जीवन कार्यक्रमां'तर्गत गंगा नदीच्या काठावर मोठ्या प्रमाणात बांबू तसेच इतर वृक्षांच्या लागवडीसाठी प्रयत्नशील

---

आयात कमी करणे व पाण्याची बचत या दृष्टीने कडधान्यांना वाढीव हमीभाव मिळणे व हमीभावाने खरेदीची यंत्रणा लागू करण्यासाठी प्रयत्नशील

---

इकॉनॉमी क्लासमधून विमान प्रवास, पोलिस संरक्षणास नकार यासारख्या मार्गांनी शासकीय खर्चात बचत करण्यासाठी प्रयत्नशील. सुरुवातीच्या काळात दिल्लीतील निवासासाठी झालेल्या जादा खर्चाची भरपाई म्हणून 'पंतप्रधान साहाय्यता निधी'त पाच लाख रुपये जमा

---

पुणे संपर्क कार्यालयात 'प्रोॲक्टिव्ह मॅनेजमेंट इन्फर्मेशन सिस्टीम' कार्यान्वित. या यंत्रणेमुळे येणाऱ्या प्रत्येक कामाची ऑनलाईन नोंदणी होत असून, त्या कामाचे स्टेटस अपडेट्स नागरिकांना वेळोवेळी 'एसएमएस'द्वारे मिळत आहेत.

---

केंद्र सरकारतर्फे राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा योग्य आढावा आणि यशस्वी अंमलबजावणीच्या दृष्टीने 'प्रोॲक्टिव्ह मॅनेजमेंट इन्फर्मेशन सिस्टिम' कार्यान्वित करण्यासंदर्भात भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. अमित शहा यांना सूचना

# संसदेतील कामगिरी

# उल्लेखनीय उपस्थिती, सक्रिय सहभाग

खासदार अनिल शिरोळे यांची सोळाव्या लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनापासून (२०१४) ते २०१६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापर्यंतची संसदेतील सरासरी उपस्थिती

**९५.२८%**

**२०१४** मधील अधिवेशने (१५ जुलै, १६ जुलै, १ ऑगस्ट, १८ डिसेंबर)

## विषय / विधेयक

1. द मोटार व्हेईकल (सुधारित) विधेयक (२०१४)
2. महाराष्ट्र सरकार इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देत नसल्याबाबतच्या चर्चेत सहभाग
3. अर्थसंकल्प - अतिरिक्त अनुदानाबाबत मागणी
4. रेल्वे अर्थसंकल्प - अतिरिक्त अनुदानाबाबत मागणी

खासदार अनिल शिरोळे यांनी डिसेंबर २०१५ पर्यंत वेगवेगळ्या महत्त्वाच्या विषयांवर एकूण ५४ प्रश्न उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले.

**पुण्याचे खासदार अनिल शिरोळे यांची त्यांच्या कार्यक्षेत्रातील म्हणजेच संसदेतील उपस्थिती आदर्शवत आहेच, शिवाय संसदेतील कामकाजात वेळोवेळी सक्रिय सहभाग नोंदवत राज्यासमोरील आणि देशासमोरील प्रश्नांवर त्यांनी मांडलेल्या विचारांची सभागृहाने योग्य ती दखलही घेतली आहे. शिरोळे यांची संसदेतील उपस्थिती, विविध चर्चांमधील त्यांचा सहभाग आणि त्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर एक दृष्टिक्षेप...**

{ तूरडाळीच्या उत्पादनातील वाढ ते बांगलादेशी विस्थापितांच्या घुसखोरीविरोधी उपाययोजनांपर्यंत संसदेतील विविध चर्चांमध्ये खासदार शिरोळे यांनी सहभाग नोंदवत संबंधित प्रश्नांवर आपले ठाम विचार मांडले. }



**२०१५** ▸ २०१५ मधील अधिवेशने
(३, १०, १२, १६ मार्च, ३० नोव्हेंबर)


## विषय / विधेयक

1. देशातील तूरडाळीच्या उत्पादनवाढीसाठीच्या उपाययोजना
2. अर्थसंकल्प - २०१५-१६ आणि २०१४-१५ वर अनुदानासंबंधी मागण्या आणि पुरवणी मागण्या
3. रेल्वे अर्थसंकल्प - २०१५-१६ आणि २०१४-१५ वर पुरवणी मागण्या
4. स्वाईन फ्लूसंबंधी चर्चेत सहभाग
5. बांगलादेशी नागरिकांच्या भारतात होणाऱ्या घुसखोरीविरोधी चर्चेत सहभाग

# प्रमुख पत्रव्यवहार

## समाजहिताचे प्रश्न धसास लावण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न

लोकशाही व्यवस्थेमध्ये खासदाराची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची असते. कारण खासदाराचा मतदारसंघ हा एखादे शहर किंवा काही तालुक्यांपुरता मर्यादित असला, तरी संसदेत निवडून गेल्यावर त्याच्याकडून मतदारसंघाबरोबरच राज्याचे आणि देशाचे प्रतिनिधित्व अपेक्षित असते. पुण्याचे खासदार अनिल शिरोळे यांनी गेल्या दोन वर्षांतील वाटचालीत शहर, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील प्रमुख विषयांबाबत सक्रिय सहभाग घेतला. पंतप्रधानांपासून केंद्रातील अर्थमंत्री, रेल्वेमंत्री, संरक्षणमंत्री, गृहमंत्री, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तांशी पत्रव्यवहार करून त्यांनी प्रमुख प्रश्नांवर आपली भूमिका स्पष्ट करतानाच आवश्यक तेथे नवीन उपायदेखील सुचविले आहेत.



सत्यमेव जयते

प्रधान मंत्री

Prime Minister

New Delhi
July 31, 2015

Dear Shri Shirole,

I have received your letter of July 18, 2015 regarding the alignment of Pune Metro Rail.

With regards,

Yours sincerely,

(Narendra Modi)

Shri Anil Shirole, MP
213, North Avenue
New Delhi-110001



# पंतप्रधान नरेंद्र मोदी

एकूण पत्रे २८

## ठळक नोंदी

i. पुण्यातील मेट्रो ही निर्दोष व किफायतशीर असावी यासाठी खासदार शिरोळे सतत प्रयत्नशील असून, शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बळकट करण्याच्या दृष्टीने प्रस्तावित मेट्रो कशी व्यवहार्य ठरेल, यासंदर्भात पंतप्रधानांना तपशिलात विवेचन

ii. पुण्यासाठी स्वतंत्र आंतरराष्ट्रीय विमानतळ विकसित करण्यासंदर्भात घडामोडींनी वेग घेतला असून, लवकरच प्रस्तावित विमानतळासाठीची जमीन निश्चित होणार आहे. यासंदर्भात पंतप्रधानांना सविस्तर पत्र

iii. पुण्यातील मगरपट्टा सिटी ही टाऊनशिप आणि आयटी पार्कचे उदाहरण देऊन देशातील महत्त्वाच्या विकास प्रकल्पांसाठी भूसंपादन करताना शेतकऱ्यांना सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने सूचना

iv. रेल्वे स्टेशनवर जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'वर्ल्ड क्लास स्टेशन' हा प्रकल्प पुण्यात राबविताना पुणे रेल्वे स्टेशन आणि शिवाजीनगर रेल्वे स्टेशनचा एकत्रित विचार करण्याची विनंती

v. तूरडाळीच्या वाढत्या भावावर, या डाळीचे देशांतर्गत उत्पादन वाढविणे हा सक्षम पर्याय असल्याचे मत नोंदवत उत्पादनवाढीसाठी २०१६ च्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना आंतरपीक म्हणून तूरडाळीचे पीक घेण्यासाठी प्रोत्साहन देण्याविषयी सूचना

vi. 'प्रधानमंत्री जन-धन योजने'च्या खात्यांमध्ये जमा झालेल्या ३,६०० कोटींच्या निधीपैकी काही निधी सहकारी संस्था, महिला बचत गट यांमार्फत शेतकऱ्यांना उपलब्ध करून देता येईल अशी सूचना




# राजनाथ सिंह

केंद्रीय गृहमंत्री

एकूण पत्रे ७

i. राज्याच्या पोलिस दलातील मनुष्यबळाची कमतरता भरून काढण्यासाठी लष्करातून निवृत्त होणाऱ्या सक्षम जवानांना पोलिस दलात हवालदार म्हणून नियुक्त करण्यासंबंधी सूचना

ii. दहशतवादी हल्ले रोखण्यासाठी गुप्तचर खाते आणि पोलिस दलांनी सामान्य नागरिकांना विश्वासात घेण्यासाठीची यंत्रणा निर्माण करण्याची महत्त्वपूर्ण सूचना. अशा यंत्रणेमार्फत संवेदनशील माहिती गुप्तचर यंत्रणांपर्यंत पोचवून संभाव्य हल्ले रोखता येणे शक्य होऊ शकते.



ANIL SHIROLE
MEMBER OF PARLIAMENT
(LOK SABHA)

सत्यमेव जयते

1201/3/20, Ghole Road,
Near Hotel Deccan Rendezvous,
Pune - 411 004.
Tel. : 91-20-25534100 / 4200
Mobile : 91-9890002250
Email : reach@anilshirole.com
shiroleanil@gmail.com

To,
**Shri Rajnath Singh ji,**
**Hon'ble Union Home Minister,**
**New Delhi.**

**Date:- 24/11/2015**

Respected Sir,

Increasing incidents of terrorism are being reported. It is felt that the information available to the police & other law enforcement agencies is not adequate to enable them to take preventive action to the desired extent.

Members of the general population are not inclined to report suspicious movements of persons of these agencies for fear of physical danger.

It is felt that if a person has information on crime / criminals including terrorists it should be made possible for him to report the same to a person designated by the government to receive such information, give it an identification number, remove the informant's name, address etc & forward the information to the appropriate authority for necessary action.

A large numbers of




# अरुण जेटली

केंद्रीय अर्थमंत्री




i. लोकसभा आणि राज्यसभेने मे २०१६ मध्ये पास केलेल्या नादारी आणि दिवाळखोरी विधेयकातील कलमे निश्चित करण्यासाठी संसदेच्या संयुक्त समितीमध्ये खासदार शिरोळे यांचा समावेश होता. दिवाळखोरीसंदर्भातील हा प्रस्तावित कायदा अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने केंद्रीय अर्थमंत्र्यांना पाठविलेल्या सविस्तर पत्रात अनेक उपाययोजना सुचवल्या. 'आपल्या सूचनांचा नवीन कायद्याची रूपरेषा ठरविताना निश्चित विचार केला जाईल', अशी हमी अर्थमंत्री अरुण जेटली यांनी या पत्राला उत्तर देताना दिली.

ii. केंद्राच्या २०१५ च्या अर्थसंकल्पात पुण्यात 'ॲग्री-बायोटेक क्लस्टर' विकसित करण्याची घोषणा अर्थमंत्री अरुण जेटली यांनी केली. हा प्रस्तावित प्रकल्प 'हिंदुस्तान ॲंटिबायोटिक्स लिमिटेड' (एचए) या पिंपरीतील सरकारी मालकीच्या कंपनीत उभारता येईल, अशी महत्त्वपूर्ण सूचना खासदार शिरोळे यांनी जेटली यांना पत्राद्वारे केली. 'एचए'च्या जागेवर हा नवीन प्रकल्प आल्यास या कंपनीला नवसंजीवनी मिळेल आणि त्याबचरोबर तेथील कर्मचाऱ्यांचा रोजगारही कायम राहील. 'एचए' ही कंपनी ८० हेक्टर जागेत असल्याने नवीन प्रकल्पासाठी भूसंपादन करण्याचीही आवश्यकता राहणार नाही.



ANIL SHIROLE

The Ashoka Hotel
Chanakyapuri,
New Delhi.
09890002250(M)

Date: 11 July, 2014

Subject :- Pending issues of Pune Municipal corporation with Defence Department, Central Government.

Respected Jaitley Ji.

1. Name of the Project

Construction of Railway Over Bridge at Ghorpadi on Pune-Miraj and Pune-Solapur railway line.

Pune city is growing rapidly and development of Industries is on fast track in this area. As mentioned; the Eastern part of city is heavily populated and also there is heavy traffic flow in the area resulting in traffic congestion at the two level crossings; namely Pune-Miraj railway level crossing and Pune-Solapur railway crossing.

The distance between the two level crossings is around 700 Mts. Frequent closures of railway gates at these level crossings causing in-convenience to commutes will further aggravate as the local trains will ply on the route in near future.

To solve the above menace of traffic congestion, Pune Municipal Corporation has planned to construct two Railway over bridges on the level crossings as mentioned above.

The land required for these projects belong to Defence Estate Office and Pune Cantonment Board. Pune Municipal Corporation has prepared a proposal in detail citing the land required for the purpose and the same has been submitted to the Defence Authorities.

The Pune Municipal Corporation has already deposited an amount of Rs. 9,76,165/- with Railways against the scrutiny charges and technical approval of the proposed Railway Over Bridges. However, Army Officers are taking objection to the project citing security reasons.

To discuss the above subject, a meeting was held on 27th August, 2013 at the office of Pune Sub Area; followed by a site visit on 2nd Sept. 2013. Instead of two Railway Over Bridges, the Defence Authorities have suggested one Railway Over Bridges at B.T. Kawade T-junction.




# नितीन गडकरी

केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक व जहाजबांधणीमंत्री

एकूण पत्रे
७

i. लोहगाव विमानतळ विस्तारीकरण, मेट्रो, रिंग रोड अशा शहराच्या विकासाशी निगडित प्रकल्पांना मा. नितीनजी गडकरी यांनी गती दिली असून, या सर्व प्रकल्पांची सध्या वेगाने कार्यवाही सुरू आहे.

ii. मुंबई-बंगळुरु राष्ट्रीय महामार्गावरील (एनएच ४) पुण्याच्या हद्दीतील प्रलंबित प्रश्नांवर कार्यवाही सुरू

a) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ वर चांदणी चौकात पुण्यातील ५ रस्ते येऊन मिळत असल्याने या चौकात वाहतूककोंडीचा मोठा प्रश्न आहे. या चौकात इंटिग्रेटेड स्ट्रक्चरसंदर्भातील प्रकल्पावर कार्यवाही सुरू

b) कात्रज चौकातील वाहतूककोंडी टाळण्यासाठी पुणे महानगरपालिकेतर्फे येथे भुयारी मार्ग आणि उड्डाणपूल प्रस्तावित असून, हा भाग राष्ट्रीय महामार्गाच्या हद्दीत येत असल्याने ‘एनएचएआय’ला निर्देश देण्याची विनंती

c) सूस खिंडीजवळील वाहतूक सुरळीत करण्याच्या दृष्टीने येथे २४ मीटर रुंदीचा उड्डाणपूल आणि सर्व्हिस रोड प्रस्तावित असून, हा महत्त्वाचा प्रकल्प लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने ‘एनएचएआय’ला आदेश देण्याची विनंती

d) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ वर कात्रज-देहू रोड बायपास दरम्यान बांबूची लागवड करण्याचे नियोजन. बांबूच्या वृक्षांमुळे या महामार्गाच्या दोन्ही बाजूस जमिनीची धूप कमी होण्यास मदत होईल आणि या संपूर्ण परिसरातील वनराईचे प्रमाण वाढेल.





# सुषमा स्वराज

परराष्ट्रमंत्री

एकूण पत्रे ३

i. विमानतळावर प्रवेश केल्यावर ई-व्हिसा मिळण्याची सुविधा असलेल्या विमानतळांमध्ये पुण्याचा समावेश करण्याची विनंती. शिक्षण, आयटी, ऑटोमोबाईल या क्षेत्रांसाठी प्रसिद्ध असलेल्या पुण्याला परदेशी नागरिक मोठ्या प्रमाणात भेट देतात. ई-व्हिसाची सुविधा पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुरू केल्यास परदेशी नागरिकांना थेट पुण्यात उतरणे शक्य होईल.

ii. कृष्णमूर्ती स्वामिनाथन हे पुणेकर नोकरीनिमित्त नायजेरियामध्ये असताना जुलै २०१४ मध्ये त्यांचे अपहरण झाले. त्यांचे चिरंजीव अमित यांनी खासदार अनिल शिरोळे यांच्याशी त्वरित संपर्क साधला. श्री. शिरोळे यांनी ही गंभीर बाब तातडीने परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांच्यापर्यंत पोचविली. श्रीमती स्वराज यांनी नायजेरियातील भारतीय दूतावासाशी संपर्क साधून सूत्रे हलविली. या सर्व प्रयत्नांना यश आले आणि स्वामिनाथन यांची अपहरणकर्त्यांच्या तावडीतून सुटका झाली. पुढे त्यांना भारतात आणेपर्यंतही श्री. शिरोळे यांनी मोलाचे सहकार्य केले.



**ANIL SHIROLE**
MEMBER OF PARLIAMENT
(LOK SABHA)

सत्यमेव जयते

1201/3/20, Ghole Road,
Near Hotel Deccan Rendezvous,
Pune - 411 004
Tel : 91-20-25534100 / 4200
Mobile : 91-9890002250
Email : reach@anilshirole.com
shiroleanil@gmail.com

To,
**Smt Sushma Ji Swaraj,**
Hon'ble Minister for External Affairs,
Govt of India,
New Delhi.

Date - 09/07/2016

Subject : Regarding E Travel Visa (E TV) to be made applicable/available for entry into Pune International Airport.

Respected Madam,

Kindly refer to the request letter attached along with from the Mahratta Chamber of Commerce Industries, & Agriculture (MCCIA) where in they have requested that Pune needs to be included in the list of Airports for valid entry on E - Visa. Pune is considered as an educational and industrial hub with Auto & IT industries. Many foreign nationals keep travelling to Pune and it becomes a problem for them if they cannot arrive to the city directly on e - visa.

MCCIA has written to you earlier on 19th Dec 2015 regarding the same




# व्यंकय्या नायडू

केंद्रीय शहर विकास आणि माहिती व प्रसारणमंत्री

एकूण पत्रे
१०

i. पुण्यातील प्रेस इन्फर्मेशन ब्युरोचे (पीआयबी) कार्यालय बंद करण्याचा माहिती प्रसारण मंत्रालयाचा निर्णय मागे घेण्याची विनंती. पुण्याचे 'पीआयबी'चे कार्यालय बंद झाल्यास येणारा अतिरिक्त भार सांभाळणे मुंबई पीआयबी कार्यालयासाठी अवघड ठरेल.

ii. 'हाउसिंग फॉर ऑल (अर्बन) मिशन' योजनेची सक्षमपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने या योजनेतील एकूण लाभार्थी, जे या योजनेअंतर्गत घर घेण्यास पात्र आहेत त्यांची माहिती घेण्याची सूचना. या माहितीच्या आधारे एकूण विकासकामांचा आणि संसाधनांचा आराखडा तयार करणे सुलभ होईल.



ANIL SHIROLE
MEMBER OF PARLIAMENT
(LOK SABHA)

1201/3/20, Ghole Road,
Near Hotel Durgari Rendezvous,
Pune - 411 004
Tel. : 91-20-25534100 / 4200
Mobile : 91-9890002250
Email : reach@anilshirole.com
shiroleanil@gmail.com

To,
Hon'ble Venkaiah Ji Naidu,
Minister of Urban development,
Govt of India, New Delhi

Date – 04/02/2016

Sub: - Housing for All (Urban) Mission- regarding.

Ref Letter: - F.No. I-11016/1/2015-HFA-4FTS-13288,
Government of India, M/O Housing & Urban Poverty Alleviation (HFA-IV), Dated:-16/09/2015.

Respected Sir,

It may be considered if the total number of beneficiaries who would quality for houses under the "Housing for all (urban) Mission" Could be assessed when finalizing the programme. This would help in assessing the adequacy etc of the work proposed, extent of resources needed etc.



# मनोहर पर्रीकर

संरक्षणमंत्री




i. २० जून २०१६ रोजी पर्रीकर यांना पाठविलेल्या पत्रात लोहगाव विमानतळाच्या विस्तारीकरणाशी संबंधित वेगवेगळ्या विषयांमध्ये लक्ष घालण्याची विनंती केली. पत्रातील प्रमुख मुद्दे :

a) संरक्षण खात्याने लोहगाव विमानतळ विस्तारीकरणासाठी मंजूर केलेल्या १५.८४ एकर जमिनीचे हवाई दलाकडून त्वरित हस्तांतरण करणे

b) लोहगाव विमानतळावरील प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन सध्या मंजूर केलेल्या १५.८४ एकर जमिनीशिवाय विमानतळ टर्मिनलच्या पश्चिमेला ३२ एकर अतिरिक्त जागा उपलब्ध करून देणे

c) '५०९ चौक' ते विमानतळ दरम्यान रस्तारुंदीकरणास 'ना हरकत प्रमाणपत्र', सीडब्लूई ऑफिससाठी अतिरिक्त २.४ एकर जमीन देणे, मोठ्या विमानांना सुकर ठरेल असे धावपट्टीचे विस्तारीकरण करणे

ii. लुल्लानगर चौकातील पुणे महानगरपालिकेच्या प्रस्तावित उड्डाणपुलावर लष्करतर्फे हरकती घेण्यात आल्या होत्या. या प्रश्नी पर्रीकरांना लक्ष घालण्याची विनंती करून या उड्डाणपुलासाठी परवानगी मिळविली.


ANIL SHIROLE
MEMBER OF PARLIAMENT

To,
Govt of India
New Delhi

Regards



# सुरेश प्रभू

रेल्वेमंत्री

एकूण पत्रे
२२

i. सौर ऊर्जा या प्रमुख अपारंपरिक ऊर्जास्रोताचा वापर वाढविण्याच्या दृष्टीने देशातील रेल्वे स्थानकांच्या प्लॅटफॉर्मवर सोलर पॅनल बसविण्याची सूचना

ii. देशातील प्रमुख रेल्वे स्थानकांचा कायापालट करून त्यांना जागतिक दर्जा देण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात पुणे रेल्वे स्थानकाचा समावेश करण्याची विनंती

iii. प्रवाशांच्या मागणीनुसार पुणे-नांदेड एक्स्प्रेसचा मार्ग हा निजामाबाद, सिकंदराबाद किंवा हैदराबादपर्यंत विस्तारित करण्याची विनंती

iv. लोणावळा-दौंड या मार्गावर अतिरिक्त रेल्वे लाइन उभारत लोकलसेवा सुरू करण्यासंदर्भात यशस्वी प्रयत्न. प्रकल्प अंतिम टप्प्यात



ANIL SHIROLE
MEMBER OF PARLIAMENT
(LOK SABHA)

सत्यमेव जयते

1199/A1, Hulel Panchay, Ghole Road,
Behind Sant Tukaram Paduka Temple,
Pune : 411 004 (Maharashtra)
Mobile : 09890002250
E-mail : shiroleanil@gmail.com
213, North Avenue, New Delhi-110001

To,
Shri Suresh Ji Prabhu,
Hon'ble Minister for Railways,
Govt of India
New Delhi

Date : 17/06/2015

Subject : Considering developing Shivajinagar and Pune railway stations as one entity.

Respected Sir,

The Railways proposed to develop certain stations as "World Class" ones. Development of Pune as a smart city would give fillip to this effort. Since Shivajinagar and Pune railway stations are very close to each other it would be desirable to consider developing the two stations as one entity to take it to "World Class" grade. This may kindly be considered.

This could also be a part of the activity of joint venture with the state government as proposed by the railways.

Thanking You
Sincerely,

Anil Shirole.



# देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

एकूण पत्रे २०

i. केंद्र सरकारने 'स्मार्ट सिटी' योजनेअंतर्गत देशात १०० शहरे विकसित करण्याची अधिकृत घोषणा २५ जून २०१५ रोजी केल्यापासून या शहरांच्या पहिल्या यादीत पुण्याचा समावेश होण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्र्यांकडे सातत्याने पाठपुरावा

ii. पुण्याच्या एकात्मिक विकासासाठी प्रलंबित 'पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा'ची (पीएमआरडीए) स्थापना केल्याबद्दल आभार, तसेच प्राधिकरणाच्या रूपरेषेबाबत सूचना

iii. राज्याच्या पोलिस दलातील मनुष्यबळाची कमतरता भरून काढण्यासाठी लष्करातून सेवानिवृत्त होणाऱ्या सक्षम जवानांना पोलिस दलात हवालदार म्हणून नियुक्त करण्यासंबंधी सूचना

iv. पुण्याच्या प्रस्तावित मेट्रो आराखड्यातील त्रुटी लक्षात आणून देऊन सर्व पुणेकरांच्या हिताच्या दृष्टीने मेट्रो हा एक सक्षम वाहतूक पर्याय म्हणून कसा साकारता येईल, या विषयी विस्तृत विवेचन.

v. लोहगाव विमानतळ विस्तारीकरणासाठी अतिरिक्त जमीन मिळवून देण्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांचे मोलाचे योगदान

vi. पुण्यातील कचऱ्याचा प्रश्न गंभीर असून, शहरासाठी घनकचरा व्यवस्थापन सर्वंकष आराखडा आखून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी नगरविकास मंत्रालयामार्फत या विषयाचा पुणे महानगरपालिकेकडे पाठपुरावा करण्याची विनंती

vii. विदर्भातील पूर्णा नदीच्या खोऱ्यात मत्स्यपालन संशोधन प्रकल्पांतर्गत झिंग्यांची पैदास करण्याबाबत सूचना


ANIL SHIROLE




# एक नई सुबह

छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा असणारे पुणे शहर हे लोकसहभाग आणि लोकसंकल्पातून देशातील अव्वल क्रमांकाचे शहर व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'स्मार्ट सिटीज् मिशन'च्या प्रकल्पांचे पुण्यात २५ जून २०१६ रोजी उद्‌घाटन केले. या वेळी खासदार अनिल शिरोळे, तत्कालीन केंद्रीय नगरविकास राज्यमंत्री बाबुल सुप्रियो, केंद्रीय नगरविकासमंत्री व्यंकय्या नायडू, राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश बापट आणि पुण्याचे महापौर प्रशांत जगताप उपस्थित होते.






an Development,
ent of India
F PROJECTS
ES MISSION
BY
NDRA MODI
STER OF INDIA
MAHA ASHTRA
E, 20
पुणे स्मार्ट सिटी
PUNE SMART CITY
DEVELOPMENT CORPORATION LTD.














# ✈ लोहगाव विमानतळ विस्तारीकरणाचा प्रश्न मार्गी




लोहगाव विमानतळावरील वाढती प्रवासीसंख्या लक्षात घेऊन विस्तारीकरणासाठी जमीन उपलब्ध करून द्यावी, याकरिता खासदार अनिल शिरोळे यांच्या विनंतीनुसार केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी आणि संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर यांनी स्वतः लक्ष घालून हवाई दलातर्फे एकूण १५.८४ एकर जागा भाडेतत्त्वावर दिली असल्याचे घोषित केले.


शहरातून विमानतळाकडे येण्यासाठीच्या पर्यायी रस्त्यासाठीही हवाई दलाची जागा देण्यास तत्त्वतः मान्यता मिळाली असून, विमानतळ विस्तारीकरणाचे काम तातडीने सुरू करावे, असे निर्देश श्री. पर्रीकर यांनी मे २०१६ मध्ये पुण्यात झालेल्या बैठकीत दिले.




▲ लोहगाव विमानतळाच्या विस्तारीकरणाचा प्रस्तावित आराखडा

(नकाशा प्रमाणानुसार नाही)

# दृष्टिक्षेपात लोहगाव विमानतळ




सध्याचे क्षेत्रफळ **२६** एकर

हवाई दलाकडून मिळालेली अतिरिक्त जमीन **१५.८४** एकर

दररोजची उड्डाणे आणि आगमने **१४०+**

विमानतळावरील रोजची प्रवाशांची संख्या **१५** हजार

सध्याचा पार्किंग बे **८**

विस्तारीकरणानंतरचा पार्किंग बे **१२**



# घोरपडी, लुल्लानगरमधील वाहतुकीचा प्रलंबित प्रश्न मार्गी

घोरपडी येथील रेल्वे क्रॉसिंगवरील उड्डाणपूल आणि लुल्लानगर परिसरातील गेरा जंक्शन चौकातील उड्डाणपुलाचा प्रश्न गेली अनेक वर्षे प्रलंबित होता. या परिसरातील ३२.३ मीटर रुंदीचा रस्ता लष्कराच्या ताब्यात असल्याने येथील पायाभूत विकासाची अनेक कामे रखडलेली होती.

या उड्डाणपुलांचा प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेऊन खासदार अनिल शिरोळे यांनी नोव्हेंबर २०१५ मध्ये संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त बैठक आयोजित केली. या बैठकीला लष्कराच्या दक्षिण मुख्यालयातील आणि कॅन्टोन्मेंट बोर्डातील अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

घोरपडी येथील रेल्वे उड्डाणपुलासाठी मिरज रेल्वे लाईनवर पिलर सिस्टीमचा वापर करून उड्डाणपूल उभारून तो आर्मी पब्लिक स्कूलच्या पुढील मोकळ्या जागेपर्यंत नेण्यात यावा, अशी सूचना श्री. पर्रीकर यांनी या बैठकीत केली. तसेच सोलापूर रेल्वे लाईनवर सोलापूर बाजारपासून मुंढव्याकडे जाताना स्प्लिट पद्धतीचा उड्डाणपूल बांधावा, असा तोडगा या बैठकीत काढण्यात आला.

### रेल्वे उड्डाणपूल क्र. १, घोरपडी (मिरज सेक्शन)





**या रेल्वे उड्डाणपुलामुळे घोरपडीकडून हडपसर आणि मुंढव्याकडे जाणाऱ्या नागरिकांची मोठी सोय होणार असून, घोरपडी रेल्वे क्रॉसिंगवरील वाहतूककोंडी संपुष्टात येणार आहे.**

## रेल्वे उड्डाणपूल क्र. २, (बी.टी.कवडे रस्ता, सोलापूर सेक्शन)




या रेल्वे उड्डाणपुलामुळे मुंढव्याकडून पुणे स्टेशन, कल्याणीनगर आणि बी. टी. कवडे रस्त्याकडे जाणाऱ्या नागरिकांची सोय होणार आहे.

## उड्डाणपूल (गेरा जंक्शन, लुल्लानगर, वानवडी)




प्रस्तावित उड्डाणपुलांची संकल्पचित्रे

लुल्लानगर भागातील गेरा जंक्शन येथे प्रस्तावित दुहेरी उड्डाणपुलामुळे या चौकातील वाहतूककोंडी संपुष्टात येणार आहे. या उड्डाणपुलामुळे कोंढव्याकडून कॅंपकडे, तसेच कॅंपकडून कोंढव्याकडे विनासायास वाहतूक शक्य होणार आहे. संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर यांच्या हस्ते ३० जुलै २०१६ रोजी या उड्डाणपुलाचे भूमिपूजन करण्यात आले.

**मार्च २०१६ मध्ये झालेल्या बैठकीत लष्कराने या दोन्ही प्रकल्पांना हिरवा कंदील दाखविला असून, एप्रिलपासून या प्रकल्पांचे काम सुरू करण्यास मान्यता दिली.**

# आरोग्यप्रश्नात लक्ष

देशातील प्रत्येक नागरिकास आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत केंद्र सरकार आग्रही आहे. 'पंतप्रधान राष्ट्रीय साहाय्यता निधी'अंतर्गत (पीएमएनआरएफ) गेल्या दोन वर्षांत सामान्य नागरिकांवरील उपचारांसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याची भूमिका खासदार अनिल  शिरोळे यांनी बजावली.

---

कॅन्सर, हृदयरोग, किडनी विकार अशा व्याधींनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना 'पीएमएनआरएफ'अंतर्गत आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी खासदार शिरोळे यांनी मदत केली. मे २०१४ ते डिसेंबर २०१५ या अवघ्या दीड वर्षात एकूण ५९ गरजू रुग्णांसाठी तब्बल ५७.५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. आजाराच्या स्वरूपानुसार ५० हजार रुपयांपासून तीन लाख रुपयांपर्यंतची मदत संबंधित रुग्णांना मिळाली.

---

हिमोफीलियाग्रस्त रुग्णांना उपचारासाठी आवश्यक असणाऱ्या औषधांचा राज्यातील शासकीय रुग्णालयातील साठा संपल्याची गंभीर बाब 'हिमोफीलिया वुमन्स सपोर्ट ग्रुप'च्या सदस्यांनी खासदार शिरोळे यांच्या लक्षात आणून दिली. त्यानंतर तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांकडून सर्व माहिती घेऊन त्यांनी राज्याचे तत्कालीन वैद्यकीय शिक्षणमंत्री विनोद तावडे यांना वस्तुस्थितीची कल्पना दिली. श्री. तावडे यांनी यासंदर्भात त्वरित कार्यवाही करून हिमोफीलियासाठीची आवश्यक औषधे उपलब्ध करून देण्याबाबत योग्य ती पावले उचलली. या निर्णयामुळे राज्यभरातील हिमोफीलियाग्रस्त रुग्णांना मोठा दिलासा मिळाला.





# ‘ससून’चा कायापालट

लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यात मतदारसंघातील सरकारी रुग्णालयांची स्थिती पालटण्यासाठी ठोस उपाययोजना करू, असे आश्वासन श्री. शिरोळे यांनी दिले होते. ससून रुग्णालयाच्या अभ्यागत मंडळाचे अध्यक्ष या नात्याने गेल्या दोन वर्षात त्यांचे या दृष्टीने कसोशीचे प्रयत्न सुरू आहेत.

- २०१५ मध्ये गांधी जयंतीच्या दिवशी खासदार शिरोळे यांनी पक्षातील सहकाऱ्यांना सोबत घेऊन स्वच्छता मोहीम राबवून ससून डेड हाऊस परिसरातील सुमारे सात ट्रक भरून कचऱ्याची विल्हेवाट लावली.
- पुण्यातील विविध कंपन्यांच्या ‘सीएसआर’ निधीतून ससून रुग्णालयाला मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न.
- ससून रुग्णालयाच्या प्रस्तावित नवीन ११ मजली इमारतीसाठी एकूण १०९ कोटी रुपयांचा निधी मा. मुख्यमंत्र्यांसमवेत झालेल्या बैठकीत मंजूर झाला असून, खासदार शिरोळे या विषयाचा सातत्याने पाठपुरावा करीत आहेत.
- ससून रुग्णालयातील शवविच्छेदन अहवाल संबंधित पोलिस ठाण्यांना प्रत्यक्ष देण्याऐवजी ऑनलाइन पद्धतीने पाठविण्याच्या महत्त्वाच्या निर्णयास नुकतीच मान्यता देण्यात आली.

# प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेची यशस्वी अंमलबजावणी

**प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना**

देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी केवळ २० टक्के नागरिकांना विमा संरक्षण आहे. ही धक्कादायक वस्तुस्थिती बदलण्यासाठी केंद्र सरकारतर्फे 'प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना' सुरू करण्यात आली असून, या योजनेअंतर्गत वैयक्तिक बँक खाते असलेल्या कोणाही भारतीयाला (वय वर्षे १८ ते ७०) वर्षाला केवळ १२ रुपये प्रीमियम भरून दोन लाख रुपयांचा जीवन विमा, तर एक लाख रुपयांचा अपंगत्व विमा प्रदान करण्यात येतो.

नागरिकांना या नवीन योजनेची इत्थंभूत माहिती देण्यासाठी शहरामध्ये अनेक जनजागृती मोहिमांचे खासदार शिरोळे यांच्यामार्फत आयोजन केले गेले. इच्छुक नागरिकांना बँकेत खाती उघडण्यापासून ते या योजनेचा अर्ज भरून त्याचा लाभ घेण्यासंदर्भात शिबिरांचेही आयोजन केले गेले. या सर्व शिबिरांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

'पंतप्रधान सुरक्षा विमा योजने'अंतर्गत पहिल्या सहा महिन्यांत **पुणे जिल्ह्यातून** झालेली नावनोंदणी

**६.८० लाख**

'पंतप्रधान सुरक्षा विमा योजने'अंतर्गत पहिल्या सहा महिन्यांत **पुणे शहरातून** झालेली नावनोंदणी


**४.७३ लाख**



'प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजने'अंतर्गत देशातील पहिला मृत्युदाव्याचा धनादेश पुण्यातून खासदार अनिल शिरोळे यांच्या हस्ते वितरित करण्यात आला. युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीमार्फत विमाधारक सुधांशू आंबेसंगे व नागनाथ कन्नावार यांच्या वारसांना अपघाती मृत्युदाव्याचे धनादेश देण्यात आले.

# खासदार निधीचा विनियोग

## अनिल शिरोळे यांच्या खासदार निधीतून विकासकामांसाठी मिळालेली रक्कम




**₹३.९१ कोटी**

पुणे शहरासाठी प्रस्तावित एकूण ७१ विकास कामांपैकी ४५ विकास कामांसाठी मंजूर झालेली रक्कम

**₹१.९२ कोटी**

पूर्ण झालेल्या आणि प्रगतिपथावर असलेल्या २३ विकास कामांसाठी वितरित झालेली रक्कम

## विकासकामांचा तपशील



**₹१.१४ कोटी**
शहरात येणाऱ्या शिवाजीनगर, कोथरूड, कसबा, पर्वती आणि कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातील विकासकामांसाठी मंजूर झालेली रक्कम

**₹६६ लाख**
पुणे रेल्वे स्टेशन आणि परिसर विकासासाठी मंजूर झालेली रक्कम

**₹८६.५ लाख**
'सांसद आदर्श ग्राम योजने'अंतर्गत मंजूर झालेली रक्कम

**₹१५ लाख**
मतदारसंघातील विविध शाळांच्या विकासासाठी मंजूर झालेली रक्कम

**₹१.१ कोटी**
'पीएमपीएमएल'च्या स्वारगेट येथील मुख्य आगारातील विशेष सौर ऊर्जा प्रकल्पासाठी मंजूर झालेली रक्कम


# लायगो इंडिया प्रकल्पाला सर्वतोपरी सहकार्य

गुरुत्वीय लहरींच्या अस्तित्वाचे पुरावे शोधण्यात शास्त्रज्ञांना मिळालेले यश ही २०१५ मधील सर्वात मोठी वैज्ञानिक घटना ठरली. थोर शास्त्रज्ञ अल्बर्ट आइन्स्टाईनने १०० वर्षांपूर्वी १९१५ मध्ये आपल्या 'जनरल थिअरी ऑफ रिलेटिव्हिटी'मध्ये गुरुत्वीय लहरींविषयी सिद्धांत मांडला होता.

वैज्ञानिक जगतात औत्सुक्याचा विषय बनून राहिलेल्या गुरुत्वीय लहरींच्या संशोधनात पुण्यातील 'आयुका' संस्थेतील शास्त्रज्ञांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. 'आयुका'ने या विषयात सखोल अभ्यास करण्याच्या दृष्टीने 'लायगो इंडिया प्रकल्प' प्रस्तावित केला असून, पुणे शहराचा खासदार म्हणून या प्रकल्पाला सर्वतोपरी सहकार्य करण्याची भूमिका खासदार अनिल शिरोळे यांनी घेतली आहे.

'लायगो इंडिया प्रकल्पां'तर्गत अत्याधुनिक प्रयोगशाळेसाठी हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ येथील जमिनीची खासदार शिरोळे यांनी केंद्राकडे शिफारस केली होती. प्रयोगशाळेसाठी हा परिसर अतिशय योग्य असून, येथील ८० टक्के जमीन ही वन खात्याची आहे. या महत्त्वाच्या वैज्ञानिक प्रकल्पासाठी उर्वरित २० टक्के जमीन देण्यास स्थानिकांची कोणतीही आडकाठी नाही. या प्रकल्पाच्या पूर्ततेसाठी घेतलेल्या पुढाकाराबद्दल 'अणुऊर्जा आयोगा'चे अध्यक्ष शेखर बसू यांनी श्री. शिरोळे यांचे अभिनंदन केले आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी श्री. शिरोळे यांचे शर्थीचे प्रयत्न सुरू असून, या प्रकल्पाला लवकरच केंद्राची परवानगी मिळणार आहे.





# केंद्राच्या ‘सोलर सिटी’ योजनेत पुण्याचा समावेश

केंद्राच्या महत्त्वाकांक्षी ‘स्मार्ट सिटीज् मिशन’च्या निवड फेरीत देशातून दुसरा क्रमांक पटकावल्यानंतर आता पुण्याची ‘सोलर सिटी’ या आणखी एका महत्त्वाच्या योजनेत निवड झाली आहे. केंद्रीय अपारंपरिक ऊर्जा मंत्रालयातर्फे राबविण्यात येणाऱ्या या योजनेद्वारे शहरात सौर ऊर्जेचा अधिकाधिक वापर करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

‘महाराष्ट्र ऊर्जा विकास अभीकरणा’तर्फे (महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी - मेडा) योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात येणार असून, पुणे महानगरपालिकेला लवकरच ‘सोलर सिटी’चा मास्टर प्लॅन बनविण्यासाठी ५० लाख रुपयांचा निधी केंद्रामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

खासदार अनिल शिरोळे गेल्या वर्षभरापासून केंद्राकडे या विषयाचा पाठपुरावा करीत होते. रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांच्याशी केलेल्या पत्रव्यवहारांत देखील पुणे स्टेशनवर सोलर पॅनल बसवून सौर ऊर्जानिर्मिती करण्यासंदर्भातील प्रस्ताव त्यांनी मांडला होता. रेल्वे विभागाबरोबरच शहरातील सर्वच शासकीय इमारतींवर सोलर पॅनल बसवून वीजनिर्मिती करण्यासंदर्भातही त्यांनी सरकारकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता.



**खासदार अनिल शिरोळे यांनी पुण्याचे पोस्टमास्तर जनरल गणेश सावळेश्वरकर यांची भेट घेऊन पोस्टातील ऑनलाईन गुंतवणुकीच्या समस्येविषयी माहिती घेतली**

# गुंतवणूकदारांना दिलासा

टपाल खात्याच्या वेगवेगळ्या योजनांमधील ऑनलाईन गुंतवणुकीची सुविधा मार्च २०१५ मध्ये संगणकीय प्रणालीत उद्भवलेल्या तांत्रिक दोषांमुळे ठप्प झाली आणि त्याचे पर्यवसन लाखो गुंतवणूकदारांच्या मनस्तापात झाले. त्यातच या वर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात पोस्टाच्या अल्पबचत योजनांचे व्याजदर कमी करण्यात आल्याने आणि नवीन व्याजदर १ एप्रिल २०१६ पासून लागू होणार असल्याने ३१ मार्चपूर्वी गुंतवणूक करण्यास अनेक गुंतवणूकदारांचे प्राधान्य होते.

सर्वसामान्य नागरिकांशी थेट संबंधित असलेल्या या समस्येचे गांभीर्य ओळखून खासदार अनिल शिरोळे यांनी पुण्याचे पोस्टमास्तर जनरल गणेश सावळेश्वरकर यांची भेट घेऊन वस्तुस्थिती जाणून घेतली. या बैठकीनंतर तातडीने दिल्लीस जाऊन त्यांनी तत्कालीन दळणवळणमंत्री रवी शंकर प्रसाद यांची भेट घेतली आणि यावर त्वरित उपाययोजना करण्याची विनंती केली. श्री. प्रसाद यांनीही परिस्थितीचे गांभीर्य ओळखून जलद पावले उचलली व ऑनलाईन गुंतवणुकीतील समस्यांचे निराकरण होत नाही तोवर ऑफलाईन पद्धतीने गुंतवणूक करण्याचा पर्याय गुंतवणूकदारांना उपलब्ध करून दिला.

प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना

अटल पेंशन योजना

# केंद्राच्या कल्याणकारी योजनेत पुण्याची आघाडी

१५ ऑगस्ट २०१४ रोजी सुरू झालेल्या 'प्रधानमंत्री जन-धन योजने'त पहिल्या टप्प्यात साडेसात कोटी बचत खाती उघडण्याचे उद्दिष्ट होते. जनजागृतीमुळे ऑगस्ट २०१५ पर्यंत देशभरात १७.७४ कोटी खाती उघडली गेली आणि त्या माध्यमातून नव्याने उघडलेल्या बँक खात्यांत २२,६४७ कोटी रुपये जमा झाले. खासदार अनिल शिरोळे यांच्या पुढाकाराने शहर आणि परिसरातील भारतीय जनता पार्टीच्या आठ आमदारांनी केलेल्या जनजागृतीमुळे पुणे जिल्ह्यातून ९,०७,२३६ खाती, तर शहरातून ६,७६,७८३ खाती उघडली गेली. 'प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजने'त जिल्ह्यातून ६,७९,९४६, तर शहरातून ४,७२,९७८ खात्यांची नोंदणी झाली. 'अटल पेन्शन योजने'त जिल्ह्यातून ४५,९२४, तर शहरातून ३५,९११ खात्यांची नोंदणी झाली आहे.

'प्रधानमंत्री जन-धन योजने'च्या पहिल्या टप्प्यात उघडली गेलेली खाती

| पुणे जिल्हा | पुणे शहर |
|---|---|
| ९,०७,२३६ | ६,७६,७८३ |

'अटल पेन्शन योजने'अंतर्गत झालेली खात्यांची नोंदणी

| पुणे जिल्हा | पुणे शहर |
|---|---|
| ४५,९२४ | ३५,९११ |



**ढोल-ताशा पथकांच्या कार्यकर्त्यांसोबत 'शहर स्वच्छता मोहिमे'त सहभागी झालेले खासदार अनिल शिरोळे**

# स्वच्छ भारत, स्वच्छ पुणे

ढोल-ताशावर दमदार ताल धरत गणेशोत्सवात चैतन्य आणणाऱ्या ढोल पथकांतील तरुणाई २०१५ सालच्या उत्सवापूर्वी 'शहर स्वच्छता मोहिमे'साठी एकवटली. खासदार अनिल शिरोळे यांच्या पुढाकारातून आणि 'ढोल-ताशा महासंघा'च्या वतीने आयोजित स्वच्छता व पाणीबचतीबाबत जनजागृती अभियानात शहरातील ३१ हून अधिक पथकांतील २,१०० वादकांनी स्वच्छतेचा व पाणीबचतीचा संदेश दिला. २०१६ च्या गणेशोत्सवामध्ये ही मोहीम शहरात आणखी व्यापकपणे राबविण्याचे खासदार शिरोळे यांचे नियोजन असून, त्या दृष्टीने प्रयत्नही सुरू करण्यात आले आहेत.

स्वच्छ भारत

एक कदम स्वच्छता की ओर



**पुणे महानगरपालिकेच्या वृक्षतोडीच्या निर्णयाविरोधात 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा'च्या मुख्य प्रवेशद्वारासममोर आंदोलनात सहभाग**

## पर्यावरणपूरक भूमिका

शहरातील पायाभूत सुविधांचा विकास हा पर्यावरणपूरक दृष्टिकोनातूनच व्हायला हवा, याबाबत खासदार शिरोळे ठाम आहेत. त्यामुळेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ते राजभवन या मार्गाच्या रुंदीकरणासाठी जेव्हा पुणे महानगरपालिकेतर्फे ९६ वृक्षांच्या छाटणीचा प्रस्ताव तयार करण्यात आला, तेव्हा खासदार शिरोळे यांच्यासह विविध निसर्गप्रेमी नागरिक-संघटनांनी त्याला कडाडून विरोध केला. जंगली महाराज रस्ता व बंडगार्डन रस्ता हे पुण्यातील मोठे रस्ते वृक्षतोड न करता गेली अनेक वर्षे वाहतुकीचा भार सांभाळत आहेत. त्यामुळे झाडांची कत्तल करून रस्तारुंदीकरणाचा घाट महानगरपालिकेने घालू नये, असे ठाम मत खासदार शिरोळे यांनी मांडले. सजग खासदार आणि पर्यावरणस्नेही नागरिकांच्या सडेतोड भूमिकेमुळे वृक्षतोडीचा प्रस्ताव अखेर मागे घेण्यात आला.



# शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरेंना पाठिंबा


महाराष्ट्र सरकारने शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार' जाहीर केल्यावर काही संघटना आणि राजकीय नेत्यांनी कोणत्याही अभ्यासाविना केवळ द्वेषाने बाबासाहेब पुरंदरे यांच्या विरोधात भूमिका घेतली. या पार्श्वभूमीवर श्री. पुरंदरे यांच्या पुरस्काराच्या समर्थनार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना खासदार शिरोळे यांनी निवेदन पाठविले आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि पुणे शहर भाजपा श्री. पुरंदरे यांच्या पाठीशी ठाम उभा राहिला. १९ ऑगस्ट २०१५ रोजी 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार' सोहळा मुंबईत राजभवन येथे निर्विघ्नपणे पार पडला.

# एलपीजी सिलिंडरमुक्त पुणे

खासदार शिरोळे यांनी पुण्याला एलपीजी सिलिंडरमुक्त करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवले असून, शहरातील पाईप गॅसचे जोड (पीएनजी) वाढविण्यासाठी ते 'महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड'च्या (एमएनजीएल) साहाय्याने विशेष प्रयत्न करीत आहेत. गेल्या दीड वर्षात शहरातील पाईप गॅसच्या कनेक्शन्समध्ये दुपटीने वाढ झाली असून, ५० हजार नागरिकांना या सेवेचा लाभ मिळाला आहे. येत्या वर्षात शहरातील आणखी ५० ते ६० हजार कुटुंबांयैंत ही सेवा पोचविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

# सरकारी अधिकाऱ्यास न्याय

खडकी येथील दारूगोळा कारखान्यात ३० वर्षांपासून सेवेत असलेले संजय पाटील यांना सुरक्षा कर्मचाऱ्यांबरोबर झालेल्या किरकोळ वादातून कारखान्याच्या व्यवस्थापनाने २०११ मध्ये कामावरून कमी केले. श्री. पाटील यांनी याविरोधात न्यायालयात दाद मागितली. त्याचा निर्णय त्यांच्या बाजूने लागला. मात्र यानंतरही व्यवस्थापनाने जानेवारी २०१५ मध्ये श्री. पाटील यांना सक्तीने सेवानिवृत्त केले. या अन्यायाविरोधात त्यांनी खासदार शिरोळे यांच्याकडे दाद मागितली. श्री. शिरोळे यांनी संरक्षण खात्याकडे पाठपुरावा केला. सखोल चौकशीअंती श्री. पाटील यांच्यावरील सर्व आरोप मागे घेऊन त्यांना मे २०१६ मध्ये सेवेत रुजू करून घेण्यात आले.



दिनांक – १६/०५/२०१६

प्रति,
मा. श्री. अनिलराव शिरोळे साहेब,
खासदार,
सदस्य, मिनिस्टरी ऑफ डिफेन्स

विषय :– आभार व अभिनंदन.
संदर्भ :– "रिगार्डिंग कम्पलसरी रिटायर्डमेंन्ट"
श्री. संजय मु. पाटील
चार्जमन, ॲम्युनिशन फॅक्टरी, खडकी, पुणे ०३

मा. महोदय,

दिनांक ३१/१२/२०१४ रोजीचे रिगार्डिंग कम्पलसरी रिटायर्डमेंन्ट विषयी आपण संरक्षण मंत्री श्री. मनोहर पर्रीकर साहेब तसेच संरक्षण मंत्रालयातील डिफेन्स प्रोडक्शन सेक्रेट्री यांच्याशी वारंवार व सातत्याने सदर संदर्भान्वये आपण केलेल्या पाठपुराव्यास यश मिळाल्याबद्दल तसेच योग्य तो न्याय व निर्णय मिळवू दिल्याबद्दल आपले हार्दिक आभार व धन्यवाद.

आपला कृपाभिलाषी

Patil

श्री. संजय मु. पाटील, चार्जमन,
ॲम्युनिशन फॅक्टरी, खडकी,
पुणे ०३

# पुण्याशी संबंधित महत्त्वाचे निर्णय

पुणे आणि परिसराचा एकात्मिक आणि नियोजित विकास करण्याच्या दृष्टीने 'पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा'ची अर्थात 'पीएमआरडीए'ची स्थापना

मेट्रो, बीआरटी, घनकचरा व्यवस्थापन, २४ तास पाणीपुरवठा या महत्त्वाकांक्षी योजनांची पूर्तता करण्यासाठी पुण्याचा ३१ हजार कोटींचा आराखडा तयार. २०२० पर्यंत या योजना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी पुणे महानगरपालिकेला केंद्र आणि राज्याचे आर्थिक योगदान

'राष्ट्रीय महामार्ग विकास कार्यक्रमा'च्या सहाव्या टप्प्यामध्ये देशभरात १,००० किमी लांबीचे नवीन एक्स्प्रेस वे विकसित करण्याच्या १६,६८० कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत पुणे-हैदराबाद हा नवीन एक्स्प्रेस वे प्रस्तावित

सीसीटीव्हीच्या निगराणीत आलेली पुणे व पिंपरी-चिंचवड ही देशातील पहिली शहरे

'वन रँक, वन पेन्शन' (ओआरओपी) ही सैनिकांसाठीची निवृत्तिवेतन योजना केंद्र सरकारतर्फे लागू करण्यात आली. या निर्णयाने २६ लाख सेवानिवृत्त सैनिक आणि ६ लाखांवर शहिदांच्या विधवांना लाभ मिळणार आहे.

लोणावळा-दौंड हा प्रवास कमीत कमी वेळेत आणि विनासायास व्हावा या दृष्टीने या मार्गावर अतिरिक्त रेल्वे लाइन उभारून लोकल सेवा सुरू करण्यासाठी खासदार शिरोळे सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. पुणे-दौंड मार्गावरील प्रस्तावित लोकल मार्गाच्या विद्युतीकरणाचे काम आता अंतिम टप्प्यात आले असून, लवकरच ही बहुप्रतीक्षित लोकल सेवा कार्यान्वित होणार आहे.

Smart City
MISSION TRANSFORM-NATION

# ‘स्मार्ट सिटी’च्या दिशेने दमदार पाऊल

श्री. अनिल शिरोळे यांनी मे २०१४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीसाठी प्रकाशित केलेल्या जाहीरनाम्याचे शीर्षक होते, **निर्धार पुण्याच्या विकासाचा, निर्धार समस्यामुक्त पुण्याचा.** हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून पुण्याचा ‘स्मार्ट सिटी’ योजनेत समावेश करण्याच्या दृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न करणार, असे आश्वासन देणारे श्री. शिरोळे राज्यातील एकमेव उमेदवार होते.

गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत केंद्र, राज्य आणि महानगरपालिका या तिन्ही स्तरांवर या महत्त्वाकांक्षी योजनेत शहराचा सहभाग होण्यासाठी केलेला पाठपुरावा आणि पुणेकरांकडून या योजनेच्या आखणीसाठी मिळालेले मोलाचे योगदान, या एकत्रित प्रयत्नांमुळे **स्मार्ट सिटीज् मिशनमध्ये पुण्याचा समावेश झाला.**

## पुणेकरांना मन:पूर्वक धन्यवाद!

केंद्राच्या महत्त्वाकांक्षी ‘स्मार्ट सिटीज् मिशन’मध्ये पुण्याची निवड होण्यामागे पुणेकर नागरिकांचे मोलाचे योगदान आहे. पुणे महानगरपालिकेतर्फे सुरू करण्यात आलेल्या **‘माझे स्वप्न, स्मार्ट पुणे’** या ऑनलाईन पोर्टलला नागरिकांनी शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने उत्तमोत्तम कल्पक सूचना देत उदंड प्रतिसाद दिला. www.punesmartcity.in या वेबसाईटला या काळात एकूण **५ लाख ३५ हजार ३१०** हिट्स मिळाल्या. तसेच या वेळी घेण्यात आलेल्या स्पर्धेत एकूण ६,८५५ नागरिकांनी स्मार्ट कल्पना पाठविल्या. या सर्व सर्जनशील उपाययोजनांमधून अंतिम ३० सूचना महानगरपालिकेच्या स्वतंत्र समितीमार्फत निवडण्यात आल्या. यातील पहिल्या तीन सूचनांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. पुण्याची ‘स्मार्ट सिटी’च्या दिशेने यशस्वी वाटचाल करण्यात पुणेकरांनी घेतलेल्या पुढाकाराचा मोलाचा वाटा असून, या निमित्ताने मी आपणा सर्वांचे मनापासून आभार मानतो.

# स्मार्ट सिटीज् मिशन : पुण्यातील प्रमुख प्रकल्प

'स्मार्ट सिटीज् मिशन'अंतर्गत पहिल्या टप्प्यात देशातील २० शहरांतील 'स्मार्ट सिटी योजने'चा शुभारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २५ जून २०१६ रोजी पुण्यात झाला. या वेळी एकूण ८४ स्मार्ट सिटी प्रकल्पांचे उद्घाटन झाले. यापैकी १४ प्रकल्प पुणे शहरात राबविण्यात येणार आहेत. 'स्मार्ट सिटी योजने'अंतर्गत पुण्यात राबविण्यात येणारे प्रकल्प :

१ **तरुणांना रोजगाराचे प्रशिक्षण देण्यासाठी वॉर्डस्तरावर लाइट हाऊस** उभारणार. प्रायोगिक तत्त्वावर औंध क्षेत्रीय कार्यालयात असे केंद्र कार्यरत. शहरातील इतर प्रभागांमध्ये या योजनेची अंमलबजावणी होणार आहे.

२ औंध येथील **डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहतीमधील कुटुंबीयांचे 'सर्वांसाठी घर' या योजनेअंतर्गत पुनर्वसन** केले जाणार आहे.

३ नागरिकांची सोय आणि सुरक्षितता लक्षात घेऊन **पादचारी मार्ग व सायकल ट्रॅक** उभारण्यात येणार आहेत.

४ सुरक्षित व सुनिश्चित सार्वजनिक वाहतुकीसाठी 'पीएमपीएमएल'तर्फे एक अत्याधुनिक नियंत्रण कक्ष - **सेंट्रल कमांड अँड कंट्रोल सेंटर** स्थापन करण्यात आले आहे. शहरात धावणाऱ्या सर्व पीएमपी बसेसचे व्यवस्थापन या कक्षातर्फे पाहिले जाणार आहे.

५ 'पीएमपी'सह सर्व सार्वजनिक वाहनांच्या नियमित **देखभाल-दुरुस्तीसाठी विशेष यंत्रणा** (व्हेईकल हेल्थ मॉनिटरिंग) कार्यान्वित करण्यात आली आहे.

६ शहरात धावणाऱ्या दोन हजारांपेक्षा अधिक 'पीएमपीएमएल' बसेसचे इत्थंभूत वेळापत्रक आणि मार्गांची माहिती नागरिकांना उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने **विशेष मोबाईल ॲप आणि वेबसाईट** सुरू करण्यात आली आहे.






**पुणे महानगरपालिकेच्या 'स्मार्ट सिटी' प्रस्तावांतर्गत शहराच्या नियोजित विकासासाठी येत्या पाच वर्षांत मिळणारा निधी**

७ नागरिकांना किरकोळ पैशांचे व्यवहारदेखील इलेक्ट्रॉनिक ट्रान्झॅक्शनद्वारे करता यावेत, जेणेकरून आर्थिक व्यवहारांतील पारदर्शकता वाढेल या उद्देशाने पुणेकरांसाठी लवकरच **सिटी कॉमन मोबिलिटी कार्ड - मी कार्ड** ही नवीन सुविधा उपलब्ध होणार आहे. सुरुवातीला नागरिकांना 'पीएमपीएमएल'चे तिकीट या कार्डद्वारे काढता येणार आहे. तर नंतरच्या टप्प्यात इतर आर्थिक व्यवहारही या कार्डद्वारे करता येतील.

८ नागरिकांनी **सौर ऊर्जेतून विजेची गरज भागवावी** आणि उर्वरित वीज सरकारला विकावी याला चालना देणार.

९ शहरात निर्माण होणाऱ्या प्लॅस्टिक कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रमुख चौकांमध्ये **प्लॅस्टिक पुनर्वापर प्रकल्प** लवकरच कार्यान्वित केले जाणार आहेत.

१० शहरातील सर्व **कचरागाड्यांना जीपीएस ट्रॅकिंग** बसविण्यात आले असून, घनकचरा व्यवस्थापनासाठी या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे.

११ शहराच्या वाहतुकीशी संबंधित महानगरपालिकेच्या सर्व विभागांमध्ये समन्वय साधून शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी या दृष्टीने **ट्रॅफिक डिमांड मॉडेलिंग प्रोजेक्ट** राबविण्यात येणार आहे.

१२ शहराच्या विकासामध्ये नागरिकांचा सहभाग असावा यासाठी **क्वांटिफाईड सिटीज मूव्हमेंट** हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

१३ **पाणीपुरवठ्यासंबंधीच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी स्वतंत्र कक्ष** उभारण्यात आला असून, या त्याद्वारे पाणीपुरवठ्याबाबतच्या तक्रारींचे तत्काळ निवारण करण्यात येणार आहे.

१४ शहरातील सर्व रस्त्यांवर **७० हजार एलईडी दिवे** बसवून ४० टक्के ऊर्जाबचतीचे उद्दिष्ट.



वाहतूक सुधारणा आणि शहराच्या सर्व भागांत समान पाणीपुरवठा या दोन विषयांना केंद्रस्थानी ठेवून पुण्याचा स्मार्ट सिटी आराखडा आखण्यात आला आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'स्पेशल पर्पज व्हेईकल'ची (एसपीव्ही) स्थापना झाली असून, १५ सदस्यांच्या संचालक मंडळाच्या नेमणुकीची प्रक्रियाही राज्य सरकारकडून पूर्ण झाली आहे. 'स्मार्ट सिटी'अंतर्गत शहराच्या नियोजित विकासासाठी आखण्यात आलेली उद्दिष्टे आणि विकास योजना पुढीलप्रमाणे -

# वाहतूक सुधारणा

- 'बीआरटी' सक्षम करून मेट्रोसारख्या नवीन पर्यायांची वेगाने अंमलबजावणी
- हिंजवडी परिसरातील वाढती वाहतूक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने शिवाजीनगर-हिंजवडी मार्गावर मेट्रो प्रस्तावित
- सार्वजनिक वाहतुकीचा वापर सध्याच्या १५ टक्क्यांवरून ३० टक्क्यांपर्यंत वाढणार
- पुण्यातील वाहनांचा सरासरी वेग सध्याच्या १८ किलोमीटर प्रति तासावरून ३० किलोमीटर प्रति तासपर्यंत वाढणार
- 'पीएमपीएमएल' बसेसचा ताफा ३,००० पर्यंत नेणार
- पीएमपी बसेसमध्ये वाय-फाय, जीपीएस, व्हेईकल हेल्थ मॉनिटरिंग सिस्टीम (व्हीएमएस), सीसीटीव्ही बसविण्याचे उद्दिष्ट
- २९५ ट्रॅफिक सिग्नल्सवर अद्ययावत यंत्रणा उभारून वाहतुकीच्या स्वरूपानुसार सिग्नलचा कालावधी बदलणार
- पादचाऱ्यांना रस्ता ओलांडता यावा, यासाठी प्रत्येक सिग्नलवर विशेष पेडेस्ट्रियन बटन्स कार्यान्वित होणार
- 'स्मार्ट पार्किंग सुविधे'अंतर्गत सात बहुमजली कार पार्किंग सुविधा उपलब्ध होणार, पार्किंगची उपलब्धता दाखविणारे ॲपही विकसित करण्याचे उद्दिष्ट
- पुण्याचा एकात्मिक वाहतूक आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी

# पाणी व्यवस्थापन

- धरणांची पाणी साठवणूकक्षमता २३ टक्क्यांवरून ३३ टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट
- संपूर्ण शहरास २४ तास पाणीपुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठेवून ५८ नवीन पाणी साठवणूक केंद्रे विकसित करणार
- पाणीगळतीचे प्रमाण ३० टक्क्यांवरून १५ टक्क्यांवर आणण्याचे उद्दिष्ट ठेवून पाण्याची गळती रोखण्यासाठी 'हेलियम लीक आयडेंटिफिकेशन' यंत्रणा कार्यान्वित करून पाइपलाइन्सचे नियमित ऑडिट करण्याचे उद्दिष्ट
- अधिकृत नळजोडांची संख्या दीड लाखावरून चार लाखांपर्यंत वाढणार
- शहरात निर्माण होणाऱ्या १०० टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया होणार आणि प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुरवठा उद्योग, रेल्वे आणि बांधकाम क्षेत्राला करणार
- कार्यक्षम कॉल सेंटर, मोबाईल ॲप आणि वेबसाईट विकसित करून वर्षाला ३७ हजार ग्राहक तक्रारींचे निवारण करण्याची क्षमता विकसित करण्याचे उद्दिष्ट



# औंध-बाणेर-बालेवाडीचा एकात्मिक विकास

'स्मार्ट सिटीज् मिशन'अंतर्गत निवड झालेल्या २० शहरांनी पहिल्या टप्प्यात आपापल्या शहरातील ठरावीक परिसर प्रामुख्याने विकसित करावयाचा असून, विकासाचे हे मॉडेल नंतरच्या टप्प्यात संपूर्ण शहरात राबवायचे आहे. त्यानुसार पुणे महानगरपालिकेने औंध-बाणेर-बालेवाडी या उपनगरांची एकात्मिक विकासासाठी निवड केली असून, पुढील पाच वर्षांत येथे २,२०० कोटी रुपयांची गुंतवणूक आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

# मुळा-मुठा प्रदूषणमुक्तीसाठी

# ठोस पाऊल

“खासदार म्हणून पुण्याचे प्रतिनिधित्व करायची संधी मिळाल्यास मुळा-मुठा प्रदूषणमुक्त करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करेन आणि यासाठी ‘राष्ट्रीय नदी सुधार कार्यक्रमां’तर्गत जेवढ्या म्हणून योजना असतील त्या राबविण्यासाठी अखंड प्रयत्नशील राहीन”

असे आश्वासन लोकसभा निवडणूकपूर्व जाहीरनाम्यात अनिल शिरोळे यांनी दिले होते. निवडणुकीनंतर वर्षभरातच केंद्र सरकारच्या सहकार्याने या दृष्टीने ठोस कार्यवाही करण्यात खासदार शिरोळे यांना यश आले.



शहरात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता ते नदीत सोडणे, हे मुळा-मुठेच्या ऱ्हासाचे मूळ कारण आहे. त्यामुळेच ‘राष्ट्रीय नदी संवर्धन योजने’अंतर्गत (एनआरसीपी) शहरात तयार होणाऱ्या १०० टक्के सांडपाण्यावर संपूर्ण प्रक्रिया करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित नवीन ११ सांडपाणी प्रक्रिया केंद्रे उभारण्याच्या ९९० कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पास जुलै २०१५ मध्ये केंद्र सरकारने मान्यता दिली. हा प्रकल्प तीन वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, ‘जपान इंटरनॅशनल को-ऑपरेटिव्ह एजन्सी’ (जायका) या संस्थेतर्फे प्रकल्पास आर्थिक साहाय्य मिळणार आहे. याबरोबरच गुजरातमधील साबरमती नदीच्या धर्तीवर मुळा-मुठा नदीकाठ सुशोभीकरणाचा प्रकल्पही लवकरच कार्यान्वित होणार आहे.

# मुठा नदीकाठी नव्याने उभारण्यात येणारी सांडपाणी प्रक्रिया केंद्रे

(क्षमता दशलक्ष लिटर प्रतिदिन- एमएलडीमध्ये)



# आदर्श ग्राम योजनेअंतर्गत ३ गावांच्या विकासाचे लक्ष्य

‘सांसद आदर्श ग्राम योजने’अंतर्गत खासदार अनिल शिरोळे यांनी पुण्याजवळील वडगाव शिंदे हे गाव दत्तक घेतले असून, ८६.५ लाख रूपयांच्या खासदार निधीसह विविध शासकीय योजनांद्वारे मिळून आतापर्यंत ३.९८ कोटी रूपयांची विकासकामे यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली आहेत. या गावाचा विकास आराखडा श्री. शिरोळे यांनी मे २०१५ मध्ये जिल्हाधिकाऱ्यांना सादर केला. मुख्य शहरापासून पाच किलोमीटर अंतरावर वडगाव शेरी परिसरात वसलेल्या वडगाव शिंदे या गावाला उपनगराचा दर्जा देऊन परस्परपूरक विकास कार्यक्रम आखण्यात आला आहे. गावात सौर ऊर्जा प्रकल्प, ग्रामपंचायतीमध्ये ‘वाय-फाय’ कनेक्शन आणि आयएसओ सर्टिफिकेशन ही कामे आतापर्यंत पूर्ण करण्यात आली आहेत.

**‘सांसद आदर्श ग्राम योजने’च्या दुसऱ्या टप्प्यात आणखी दोन गावे विकसित करण्याचा निश्चय असून, यामध्ये मुळशी तालुक्यातील कोळावडे आणि शिरूर तालुक्यातील कासारी या गावांची निवड करण्यात आली आहे.**



मार्च २०१६ मध्ये ‘जलयुक्त शिवार’ अभियानांतर्गत वडगाव शिंदे गावात १५.३० लाख रुपयांची विकासकामे झाली. तर जुलै २०१६ मध्ये वृक्षारोपण उपक्रमांतर्गत १,२५० देशी रोपांची लागवड करण्यात आली

## नजीकच्या काळात करण्यात येणारी विकासकामे

- वडगाव शिंदे ते लोहगाव रस्तारुंदीकरण करणे. नाबार्डमार्फत या प्रकल्पासाठी २.७ कोटी रूपयांचा निधी मंजूर
- सांडपाणी व्यवस्थापनासाठी सक्षम व्यवस्था उभारणे
- ग्रामपंचायत कार्यालयावर पवनचक्की बसविणे
- गावातील अंतर्गत रस्त्यांवर सौरदिवे बसविणे
- गावातील तरुणांसाठी सुसज्ज व्यायामशाळा उभारणे
- अंगणवाडीसाठी नवीन इमारत बांधणे
- जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीची दुरुस्ती करणे
- गावात आणखी दोन जलशुद्धीकरण केंद्रे उभारणे

## ‘सांसद आदर्श ग्राम योजने’अंतर्गत आतापर्यंत पूर्ण करण्यात आलेली विकासकामे

- ३,००० लिटर क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र
- पाझर तलाव दुरुस्ती
- गावात रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण
- ग्रामपंचायतीस ‘आयएसओ’ प्रमाणपत्र आणि संपूर्ण इमारत वाय-फाय
- वडगाव शिंदेसाठी स्वतंत्र पोस्ट ऑफिस
- ‘शासन आपल्या दारी’ उपक्रमांतर्गत रेशन कार्ड, आधार कार्डांचे वितरण
- गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत ई-लर्निंग प्रकल्प

‘सांसद आदर्श ग्राम योजने’त आमच्या गावाची निवड झाल्यापासून गावात विकासाची गंगा वाहत आहे. खासदार अनिल शिरोळे हे गावात सुरू असलेल्या विविध विकासकामांवर जातीने लक्ष देत असून, आतापर्यंत अनेक कामे नियोजित वेळेत पूर्ण झाली आहेत.

- ऋषिकेश गणपत शिंदे,
सरपंच, वडगाव शिंदे



# उदगीरमधील दुष्काळावर मात करण्यासाठी महत्त्वपूर्ण सूचना



सलग दुसऱ्या वर्षी भीषण दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या मराठवाड्याला दिलासा देण्यासाठी केंद्रातील आणि राज्यातील भाजपा सरकारने कसोशीने प्रयत्न केले. भाजपाच्या लोकनियुक्त खासदार आणि आमदारांनी दुष्काळग्रस्त भागांना भेटी देऊन सादर केलेल्या अभ्यासपूर्ण अहवालांमुळे सरकारसह प्रशासनाला दुष्काळ निवारणासाठी त्वरित पावले उचलणे शक्य झाले.

भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रावसाहेब पाटील दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली खासदार अनिल शिरोळे यांनी लातूर जिल्ह्यातील उदगीर तालुक्याचा १८ एप्रिल २०१६ रोजी दौरा करून सविस्तर अहवाल सादर केला. महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील उदगीर हे महत्त्वाचे व्यापार केंद्र असून, शहराची एकूण लोकसंख्या १,०३,५५० आहे, तर दररोज २५ हजार लोक उदगीरला ये-जा करतात.

खासदार शिरोळेंनी आपल्या अहवालात उदगीरला लातूरप्रमाणेच रेल्वेने पाणीपुरठा करण्याची निकड मांडली. लातूरपासून ६५ किलोमीटरवर असलेल्या उदगीरमधील स्थिती लातूरपेक्षाही विदारक असून, तेथे ४५ दिवसांतून एकदा पाणीपुरवठा सुरू होता. तसेच गावातील जलस्रोतांमधील शिल्लक पाणीसाठाही लवकरच संपेल अशी स्थिती होती.

उदगीर हे मराठवाड्यातील एक प्रमुख तालुक्याचे ठिकाण असून, पारंपरिक व्यापार केंद्र असल्याने या शहराला वर्षभर पुरेल इतक्या पाणीसाठ्याची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने ‘अमृत’ योजनेअंतर्गत प्रकल्प विकसित करण्याची सूचना खासदार शिरोळे यांनी या अहवालाद्वारे केली.

# आमचे मार्गदर्शक



**राष्ट्रीय संत आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भय्यूजी महाराज**

राष्ट्रीय संत आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भय्यूजी महाराज हे आपल्या 'श्री सदगुरू दत्त धार्मिक एवम पारमार्थिक ट्रस्ट'द्वारे (सूर्योदय ट्रस्ट) देशसेवा करीत आहेत. खासदार अनिल शिरोळे हे भय्यूजी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली 'सूर्योदय ट्रस्ट'द्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवत असतात.

# देश बदलतोय...

## प्रधानमंत्री जन-धन योजना




**२१.५१ कोटी**

'प्रधानमंत्री जन-धन योजने'अंतर्गत देशभरात उघडण्यात आलेली बँक खाती

**१.३९ कोटी**

'प्रधानमंत्री जन-धन योजने'अंतर्गत महाराष्ट्रात उघडण्यात आलेली एकूण खाती

**६.७६ लाख**

'प्रधानमंत्री जन-धन योजने'अंतर्गत **पुण्यात** उघडण्यात आलेली खाती

शहराच्या एकूण लोकसंख्येपैकी **२२%** नागरिकांनी 'प्रधानमंत्री जन-धन योजने'अंतर्गत बँकांमध्ये खाती उघडली



**₹३६,६०० कोटी**


'प्रधानमंत्री जन-धन योजने'अंतर्गत देशभरात बँक खात्यांमध्ये जमा झालेली रक्कम

**₹२,१५५ कोटी**

'प्रधानमंत्री जन-धन योजने'अंतर्गत महाराष्ट्रात बँक खात्यांमध्ये जमा झालेली रक्कम

(सर्व आकडेवारी एप्रिल २०१६ अखेरपर्यंतची)

# आधार कार्ड




**१००.५५ कोटी**

देशभरात एप्रिल २०१६ पर्यंत वितरित करण्यात आलेली एकूण आधार कार्डे (यूआयडी क्रमांक)

**१०.६० कोटी**

महाराष्ट्रात वितरित करण्यात आलेली एकूण आधार कार्डे

**८४.३४ लाख**

पुणे जिल्ह्यात वितरित करण्यात आलेली एकूण आधार कार्डे

**पुणे जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ८९% नागरिकांकडे स्वतःचा 'आधार क्रमांक'**

'डिजिटल इंडिया' उपक्रमाअंतर्गत उघडण्यात आलेली

## डिजिलॉकर

DigiLocker

**११.५० लाख**

देशात उघडण्यात आलेली एकूण डिजिलॉकर

DigiLocker

**१.२९ लाख**

महाराष्ट्रात उघडण्यात आलेली एकूण डिजिलॉकर

DigiLocker

**१२ हजार**

पुण्यात उघडण्यात आलेली एकूण डिजिलॉकर

# राज्यातील सक्षम कारभार

- २०१९ पर्यंत महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याच्या उद्देशाने हाती घेण्यात आलेल्या 'जलयुक्त शिवार' या योजनेअंतर्गत आतापर्यंत ५१,३३२ शेततळ्यांचे काम पूर्ण करण्यात यश
- राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागू. १५ वर्षे प्रलंबित कायद्याला राष्ट्रपतींकडून मंजुरी
- राज्य सरकारचे २ टोलनाके वगळता सर्व टोलनाके बंद. उर्वरित ५३ टोल नाक्यांवर कार, जीप, एसटी बसेसना पथकरातून सूट
- १ ऑगस्ट २०१५ पासून 'एलबीटी' बंद. महानगरपालिकांचे आर्थिक स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी साहाय्यक अनुदान
- भारनियमनमुक्तीच्या उद्दिष्टाने केलेल्या उत्तम वीज व्यवस्थापनामुळे गेल्या दोन वर्षांत राज्यात कोठेही भारनियमन नाही
- वीजबचतीसाठी २.७० कोटी घरांमध्ये सुमारे ३.६ कोटी एलईडी दिव्यांचे वितरण. अपारंपरिक ऊर्जेसाठी नवीन धोरण जाहीर
- दहावीच्या मुख्य परीक्षेत अपयशी ठरलेल्या विद्यार्थ्यांची पहिल्यांदाच मुख्य परीक्षेनंतर लगेचच फेरपरीक्षा. या निर्णयामुळे १,०७,०२६ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाचले
- राज्यातील सर्व पोलिस ठाणी ऑनलाईन आणि पेपरलेस
- ३ लाख रुपयांपेक्षा जास्तीची कामे करताना ई-निविदा प्रक्रिया लागू
- मुख्यमंत्र्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे आंतरराष्ट्रीय उद्योग समूह महाराष्ट्राकडे आकर्षित. ६६,००० कोटी रुपयांची गुंतवणूक
- नवीन आयटी धोरणामुळे ५० हजार रोजगार निर्मिती
- 'स्किल इंडिया मिशन'च्या धर्तीवर 'कुशल महाराष्ट्र, रोजगारयुक्त महाराष्ट्र' हे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून 'कौशल्यविकास व उद्योजकता' या स्वतंत्र विभागाची स्थापना
- नागरिक व शासनामध्ये दुवा साधण्याच्या उद्देशाने 'आपले सरकार' या विशेष पोर्टलची निर्मिती



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यसमवेत खासदार अनिल शिरोळे व सिद्धार्थ शिरोळे

संपर्क :

## खासदार अनिल शिरोळे

**दिल्ली कार्यालय**
८५, साऊथ अॅव्हेन्यू, नवी दिल्ली - ११०००१

**पुणे कार्यालय**
शान्ति, १२०१/३/२०, घोले रस्ता,
हॉटेल सूर्याजवळ (डेक्कन रॉन्देव्हू), पुणे - ४११००४

+९१-९८९०० ०२२५०

पुणे : ९१-२०-२५५३ ४१०० / ४२००

दिल्ली : ०११-२३०१ ९७३४

shiroleanil@gmail.com

www.anilshirole.com

anilshirole.com | @AnilShiroleBJP | AnilShirole

**प्रकाशक :**
**योगेश गोगावले**
अध्यक्ष, पुणे शहर भाजपा

दिनांक : १४ ऑगस्ट २०१६

**संकल्पना, संकलन, डिझाईन :**

MEDIA NEXT | मीडियानेक्स्ट इन्फोप्रोसेसर्स प्रा. लि., पुणे | www.medianext.in

मुद्रक : विक्रम प्रिंटर्स प्रा. लि., पर्वती, पुणे ४११००९